कारगिल विजय दिवस आपल्यासाठी राष्ट्रनिष्ठा, शौर्य आणि बलिदानाचा प्रेरणादायी संदेश - राज्यपाल जिष्णु देव वर्मा >>पान 2

उमेदच्या माध्यमातून राज्यात महिला बचत गट नोंदणी व १ कोटी लखपती दीदी संकल्प अभियान >>पान 3

उद्धव ठाकरे मुख्यमंत्रीच नव्हे, तर देशाचे पंतप्रधान व्हावेत : आ. सिद्धार्थ खरात >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार
धैर्य आणि संयम हे यशाचे खरे साथीदार आहेत.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 13 ■ मंगळवार, दि. 28 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



२९ जुलैला होणार पार्थ पवार आणि कायनात दारा यांचा साखरपुडा, निमंत्रण पत्रिका समोर

आतील पान

# संसदेत दिवसभर गोंधळ, निवेदनाच्या मुधावरून अडून राहिले विरोधक, कामकाजात सतत अडथळे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** सोमवारी विरोधी पक्षांनी संसदेत गोंधळ घातला आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज व पेलेट गनच्या कथित वापरावरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या मित्रपक्षांनी गृहमंत्री अमित शाह यांच्या निवेदनासाठी आग्रह धरला आणि लोकसभा व राज्यसभेतील कामकाजात वारंवार व्यत्यय आणून प्रस्तावित सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा विधेयकावरील चर्चे ला अडथळा आणला.



संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी, विरोधी पक्षांच्या सभागृह नेत्यांनी विद्यार्थ्यांवरील कथित पोलीस कारवाईचा मुद्दा ठळकपणे मांडण्याची रणनीती आखण्यासाठी बैठक घेतली. विरोधी पक्षांनी नियम २६७ अंतर्गत नोटिसा आणि दोन्ही सभागृहांमध्ये स्थगन प्रस्ताव सादर करून या विषयावर तातडीने चर्चा करण्याची आणि गृहमंत्र्यांच्या निवेदनाची मागणी केली. काँग्रेसने म्हटले की, सरकारला परीक्षा सुधारणा विधेयक आणायचे आहे, परंतु त्यासाठी त्यांना प्रथम विद्यार्थ्यांवरील कथित पोलीस कारवाईवर निवेदन द्यावे लागेल. काँग्रेसचे खासदार सय्यद नसीर हुसेन यांनी म्हटले की, विरोधी पक्ष परीक्षा सुधारणा विधेयकावर चर्चा करण्यास मागे हटत नाही, परंतु गृहमंत्री अमित शाह यांनी प्रथम सभागृहात निवेदन द्यावे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी.

**राहुल गांधी यांचे गृहमंत्र्यांना पत्र**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही गृहमंत्री अमित शाह यांना लिहिलेल्या पत्राचा मुद्दा उपस्थित केला. शांततेने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पेलेट गन आणि बळाचा कथित वापर करण्यास कोणी परवानगी दिली?, असा प्रश्न त्यांनी विचारला. राहुल गांधींनी आरोप केला की, विद्यार्थ्यांवर क्रूर अत्याचार करण्यात आले त्यासाठी सरकारला जबाबदार धरले पाहिजे. दिल्लीत पेलेट गन आणि बिहारमध्ये एके-४७चा वापर विद्यार्थ्यांविरुद्ध असलेल्या धोकादायक व्यवस्थेचे द्योतक आहे, असे ते म्हणाले.

**विरोधी खासदारांचे सभागृहात आंदोलन**

काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि टीएमसीसह विरोधी खासदारांनीही संसद परिसरात आंदोलन केले. विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित अतिरिक्त बळाच्या वापराची निष्पक्ष चौकशी, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई आणि गृहमंत्री यांचे सभागृहात सविस्तर निवेदन, अशी मागणी विरोधी पक्षाने केली.

## E20 इंधन बंद करा!; ४ ऑगस्टला वाहतूक संघटनांचा संसदेवर धडक मोर्चा





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** इथॅनॉलमिश्रित पेट्रोलची (E20 Fuel) सक्ती मागे घेण्याच्या मागणीसाठी दिल्लीतील विविध वाहतूक संघटनांनी येत्या ४ ऑगस्ट रोजी संसदेवर निषेध मोर्चा काढण्याची तयारी सुरू केली आहे. 'दिल्ली टॅक्सी अँड टुरिस्ट ट्रान्सपोर्टर्स अँड टूर ऑपरेटर्स असोसिएशन'सह इतर अनेक वाहतूक संघटना या प्रस्तावित आंदोलनाचे नेतृत्व करणार आहेत.संघटनेचे अध्यक्ष संजय सम्राट यांनी सांगिले की, इथॅनॉलमिश्रित पेट्रोल मागे घेण्यात यावे या मागणीसाठी आम्ही ४ ऑगस्टला संसदेवर मोर्चा काढणार आहोत. या समस्येकडे दुर्लक्ष करून झोपलेल्या खासदारांना जागे करण्यासाठी हा मोर्चा असेल. कारण देशभरातून या इथॅनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनांमध्ये तांत्रिक बिघाड होत असल्याच्या तक्रारी येत आहेत.

या आंदोलनाचा 'E-20 जनता पार्टी' किंवा कॉकरोच जनता पार्टी यांसारख्या संघटनांशी कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी २० जुलै रोजी NEET (UG) पेपरफुटी प्रकरणात 'CJP' या ऑनलाईन उपरोधिक गटाने तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी संसदेवर मोर्चा काढला होता, ज्यादरम्यान आंदोलक आणि पोलिसांमध्ये चकमक झाली होती. यावर बोलताना संजय सम्राट म्हणाले, आम्हाला या विषयाचे कोणतेही राजकारण करायचे नाही. आमचा 'E-20 जनता पार्टी', 'कॉकरोच जनता पार्टी' किंवा इतर कोणत्याही राजकीय पक्षाशी कोणताही संबंध नाही. E20 इंधनामध्ये २०% इथॅनॉल आणि ८०% पेट्रोलचे मिश्रण असते. ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेस'चे राष्ट्रीय अध्यक्ष हरिश सभावाल यांनी स्पष्ट केले की, नागरिकांसाठी E-20 हे एकमेव इंधन उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या निर्णयाविरोधात संघटनांमध्ये तीव्र असंतोष आहे.

## वर्ध्यात दहशत! १० गावांत हाय अलर्ट जारी; वनविभाग ॲक्शन मोडमध्ये

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा। प्रतिनिधी :** महाराष्ट्र आणि देशपातळीवर वन्यजीवांच्या वाढत्या वावरामुळे मानवी वस्त्यांवर आणि शेती परिसरांवर संकट ओढवल्याचे अनेकदा पाहायला मिळते. सध्या वर्धा जिल्ह्यातून एक अत्यंत महत्त्वाची आणि धास्ती भरवणारी बातमी समोर येत आहे. जिल्ह्यातील वाठोडा शिवारात एका तरुण नर वाघाचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी आणि अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रादेशिक वनविभाग पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आला असून, परिसरातील तब्बल १० गावांमध्ये खबरदारीचा इशारा (हाय अलर्ट) जारी करण्यात आला आहे.

**१० गावांवर वाघाचे संकट, प्रशासनाकडून सतर्कता**

वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, हा म ुक्तसंचार करणारा वाघ अंदाजे ३ वर्ष वयोगटातील तरुण नर आहे. त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि परिसरातील नागरिकांच्या संरक्षणासाठी प्रादेशिक वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी दिवस-रात्र परिसरातील जंगल पिंजून काढत आहेत. अत्याधुनिक यंत्रणेद्वारे आणि प्रत्यक्ष गस्तीव्दारे या वाघाच्या प्रत्येक हालचालीवर अत्यंत बारीक लक्ष ठेवले जात आहे. ज्या १० गावांमध्ये हा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे, त्यात वाठोडा, धामणगाव, आमला, वाघधरा, बेलगाव, झाडगाव, लोणसावळी, शेकापूर, जोगाधरी आणि वायफड या गावांचा समावेश आहे. या गावांमध्ये सतत वाघाचा वावर असल्यामुळे घराबाहेर पडणेही नागरिकांसाठी मुश्कील झाले असून, शेतकरी व ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.

**वनविभागाची जनजागृती आणि नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना**

परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन वनविभागाकडून सतत जनजागृती मोहीम राबवली जात आहे. नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काय करावे आणि काय करू नये, याबाबत वनधिकाऱ्यांकडून सविस्तर सूचना दिल्या जात आहेत. वनविभागाने केलेल्या आवाहनानुसार: नागरिकांनी विशेषत: सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी शेतात जाणे टाळावे. जंगलात किंवा शेतात जाताना एकटे जाणे पूर्णपणे टाळावे आणि नेहमी समूहाने वावरावे.

**जनावरांच्या गोठ्यांची आणि घरांच्या आसपास विशेष काळजी घ्यावी.**

वनविभागाची विशेष टीम सध्या संपूर्ण परिस्थितीवर सतत आणि डोळसपणे नजर ठेवून आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता वनविभागाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## आंदोलनातील पोलिसांच्या अत्याचाराचे समर्थन करता येणार नाही, लाठीमाराची चौकशी झाली पाहिजे: सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'नीट' पेपरफुटी प्रकरणात 'कॉकरोच जनता पार्टीने' जंतर-मंतरवर केलेल्या ऐतिहासिक आंदोलनानंतर आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. असं असलं तरी आंदोलनादरम्यान विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जच्या मुद्द्यावरून देशाचं राजकारण तापलं आहे. एकीकडे जंतर मंतर येथील सीजेपीच्या आंदोलनादरम्यानच्या हिंसाचारवर विरोधकांनी सरकारला जाब विचारला असताना दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाने (एल्जीस ण्दलू) देखील या बाबत महत्वाचं निरीक्षण नोंदवलं आहे. आंदोलनातील पोलिसांच्या अत्याचाराचे समर्थन करता येणार नाही, लाठीमाराची चौकशी झाली पाहिजे, असा निवार्ळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे आधी धर्मे द्र प्रधानांचा राजीनाम्याने काहीसे अडचणीत आलेल्या सरकारसह दिल्ली पोलिसांनाही हिशेब द्यावा लागणार असल्याची चर्चा आहे.





## मुंबईत पुन्हा विद्यार्थ्यांचा एल्गार! ९ ऑगस्टला भव्य रॅली काढणार, देशभरातील विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचं आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** नीट पेपरफ ुटी प्रकरणात विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर अखेर सरकारला माघार घ्यावी लागली आणि धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. दिल्लीत झालेल्या या घडाम ोडींनंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही हालचालींना वेग आला आहे. असे असताना एकीकडे दिल्लीच्या जंतर मंतरवरील सीजेपी आणि विद्यार्थ्यांचं आंदोलन संपलं असलं तरी मुंबईत पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी नऊ ऑगस्टला विविध विद्यार्थी संघटना रॅली काढणार असल्याची माहिती आहे. नीट परीक्षा पद्धतीत पारदर्शकता, महाराष्ट्रातील टीईटी पेपर फुटी प्रकरण, एमपीएससी विद्यार्थ्यांचे प्रश्न, मराठी शाळांचे प्रश्न, अशा अनेक विद्यार्थ्यांच्या समस्या घेऊन एकत्रित आंदोलनाची चळवळ सुरू ठेवणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, देशभरात विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सुरू केलेलं आंदोलन आता मुंबईमध्ये सुरूच राहणार असल्याचे चित्र आहे. म ुंबईतील विविध विद्यार्थी संघटना एकत्र येत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी ही चळवळ सुरू ठेवणार असल्याचा निर्णय विविध विद्यार्थी संघटनांनी घेतला आहे. प्रश्न मांडण्यासाठी राजकीय पक्ष नाही तर विद्यार्थी एकत्र येऊन सुद्धा लढत दिला जाऊ शकतो, असा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये आल्याचं संघटनांचे म्हणणं आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रश्नांसाठी विविध विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचं आवाहन करत विद्यार्थी संघटनांची ही चळवळ सुरू राहणार आहे.

दरम्यान, क्रांती दिनाच्या दिवशी म्हणजेच ९ ऑगस्टला पुन्हा एकदा राज्यातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नाबाबत वाचा फोडण्यासाठी विद्यार्थी संघटना एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. यात कॉक्रोच जनता पार्टी, छात्र भारती अशा विविध विद्यार्थी संघटना एकत्र येऊन ही चळवळ सुरू ठेवणार असल्याची माहिती विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी दिली आहे.

पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केले होते. त्यानंतर ण्व्झब ने २० जुलै रोजी संसद मोर्चाची घोषणा केली होती. मोर्चादरम्यान गर्दी नियंत्रणासाठी सुरक्षा दलांनी लाठीचार्ज (थ्रूप्गब ण्प्गीा) केला आणि अश्रुधूराचे गोळे डागले होते. या घटनेवरून विरोधकांनी संसदेतही सरकारला धारेवर धरले होते. आता पॅलेट गन वापरल्याच्या दाव्यामुळे या प्रकरणाला आणखी गंभीर वळण मि ळाले असून, चौकशी अहवालानंतर नेमके काय घडले? याबाबत अधिकृत चित्र स्पष्ट होणार आहे.

## महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा कायम, कोकण-घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून पुढील २४ तासांमध्ये कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राकडून मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गसह कोकणातील काही जिल्ह्यांसाठी यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. अरबी समुद्रातून मोठ्या प्रमाणात येणारा आर्द्रतेचा पुरवठा आणि सक्रिय मान्सून पट्ट्यामुळे राज्यातील पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

समुद्र खवळलेला राहणार असल्याने मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला



देण्यात आला आहे.

मुंबईत सोमवारी मध्यरात्रीनंतर पावसाचा जोर वाढला. शहर आणि उपनगरांतील सायन, किंग्ज सर्कल, अंधेरी सबवे, कुर्ला, दादर, हिंदमाता, मिलन सबवे आदी सखल भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता. काही ठिकाणी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.. उपनगरी रेल्वे सेवा सुरू असली तरी काही गाड्या उशिराने धावत होत्या. बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात आलं. तसेच पाणी उपसण्यासाठी अतिरिक्त पंप सुरू करण्यात आले. भरतीच्या काळात समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

## भंडाऱ्यात १.३४ कोटींच्या गांजासह ट्रक जप्त; बिहार-पश्चिम बंगालचे दोघे अटकेत

दैनिक आपला विदर्भ

**भंडारा । प्रतिनिधी :** भंडारा जिल्ह्यातील साकोली पोलिसांनी अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ३४ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रायपूरहून नागपूरकडे गांजाची तस्करी करणाऱ्या ट्रकवर कारवाई करत पोलिसांनी ३९९.५६० किलो गांजा हस्तगत केला असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे साकोली टोलनाक्यावर सापळा रचण्यात आला.



यावेळी २३ ८७८५ क्रमांकाचा ट्रक अडवून तपासणी केली असता, ट्रकमध्ये लपवून ठेवलेला गांजा आढळून आला. जप्त गांजाची किंमत ९९ लाख ७८ हजार रुपये असून, ट्रकसह एकूण १ कोटी ३४ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी ट्रक चालक पंकजकुमार भुषण यादव (रा. बिहार) आणि क्लिनर बापी बादल मलीक (रा. पश्चिम बंगाल) यांना अटक करण्यात आली आहे. दोघांविरुद्ध साकोली पोलीस ठाण्यात ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, या तस्करीमागील मुख्य सूत्रधार आणि संपूर्ण रॅकेटचा शोध पोलीस घेत आहेत.

पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी सांगितले की, जिल्ह्यात अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कठोर कारवाई सुरू असून, अशा बेकायदेशीर धंद्यांवर प्रभावीपणे आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

## शिर्डीत खास उपक्रम; साईबाबांच्या गुरुस्थानातील कडुनिंबाची रोपं भाविकांना प्रसाद म्हणून मिळणार

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी। प्रतिनिधी :** साईबाबा संस्थानच्या वतीने येत्या २८ ते ३० जुलै या कालावधीत गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यंदाच्या गुरुपौर्णिमा सोहळ्याचं औचित्य साधत संस्थानने साईभक्तांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा, भावनिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेतला आहे. गुरुस्थान येथील पवित्र कडुनिंबाच्या वृक्षाच्या बियांपासून तयार करण्यात आलेली रोपं साईप्रसाद म्हणून भाविकांना उपलब्ध करून देण्याचा ऐतिहासिक निर्णय संस्थाननं घेतला आहे. या उपक्रमांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर तब्बल एक लाख कडुनिंबाची रोपं तयार करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यातील ५ ते ६ हजार रोपांचं वाटप गुरुपौर्णिमेपासून सुरू होणार आहे.

## जे विरोधकांना जमले नाही ते युवाशक्तीने करून दाखविले

पेपरफुटीच्या प्रकरणावरून दिल्लीतील जंतर-मंतर येथे आरंभलेले कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने आणि उर्वरित मागण्यांसंदर्भात लेखी हमी देण्याच्या केंद्राच्या आश्र्वासनाने मागे घेण्यात आले. 'जेन-झी' म्हणवल्या जाणाऱ्या तरुण पिढीच्या संघटित शक्तीचा हा विजय मानला जात आहे. जंतर-मंतरवर ३७ दिवस उन्हापावसाची तमा न बाळगता ठामपणे उभे राहिलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला आणि समर्थकाला माझा मनःपूर्वक सलाम, अशी प्रतिक्रिया देत कॉक्रोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजित दीपके याने आंदोलनात सहभागी तरुण-तरुणींचे आभार मानले. उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्रासह देशभरामध्ये विविध ठिकाणी तरुणांनी केलेल्या प्रखर आंदोलनांची धग वाढत चालल्याचे लक्षात आल्याने केंद्र सरकारने हा निर्णय घेतला. राजीनामा टाळण्यासाठी अन्य उपायांबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, पीयूष गोयल, जे. पी. नड्डा, जितेंद्र सिंह आणि धर्मेंद्र प्रधान यांच्यात प्रदीर्घ चर्चा झाली. त्याआधी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनीही पक्षाच्या युवा नेत्यांसोबत बैठक घेतली होती. सर्व चर्चेअंती राजीनाम्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही तरुणांशी संवाद साधणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले होते. या राजीनाम्यामुळे देशातील सर्व विरोधी पक्षांमध्ये 'आनंदी आनंद गडे' अशी स्थिती आहे. प्रत्यक्षात कॉक्रोच जनता पार्टीची स्थापना, त्यांचे दिल्लीतील आंदोलन आणि या बॅनरखाली एकवटलेली देशभरातील तरुणाई आणि तिने अहिंसक मार्गाने उभ्या केलेल्या आंदोलनापुढे सरकारला नमते घ्यावे लागले, परीक्षा पद्धतीत त्रुटी राहिल्याचे मान्य करावे लागले आणि त्यासाठी शिक्षणमंत्र्यांचा राजीनामाही घ्यावा लागला. दुसरीकडे ही विरोधी पक्षांचीही सपशेल हार आहे. याचे कारण, २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये २०१९ च्या तुलनेत अधिक जागा मिळवूनही विरोधी पक्षांना जे साध्य करता आले नाही, ते युवाशक्तीने करून दाखवत त्यांच्या डोळ्यांत अंजन घातले. आंदोलन ज्या पद्धतीने हायजॅक करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी केला तो सबंध देशाने पाहिला. सोनम वांगचुक हे या आंदोलनाचे प्रणेते ठरले. आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळात गर्दी विखुरलेली होती. वांगचुक यांच्या मंचामुळे आंदोलनाला सामायिक केंद्र मिळाले. त्यामुळे प्रधानांच्या राजीनाम्यानंतर हर्षोल्हासित होऊन या तरुणांचे सत्कार सोहळे आरंभणे म्हणजे विरोधी पक्षांनी आपल्याच पराभवाचा उत्सव साजरा करण्याचा प्रकार! त्यापेक्षा शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांबाबतच्या उपाययोजनांसाठी सरकारकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना अधिक प्रभावी कशा ठरतील, यासाठी सकारात्मक पुढाकार घेतल्यास पेपरफुटीसारख्या गैरप्रकारांना आळा बसू शकेल. जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांचा रोष केवळ प्रश्र्नपत्रिका फुटल्यामुळे निर्माण झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांपासून साचलेली अस्वस्थता, शिक्षण व्यवस्थेतील विसंगती, रोजगाराबाबतची अनिश्र्चितता आणि परीक्षा केंद्रित संस्कृती यांचा मोठा वाटा आहे. देशातील शिक्षणव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणावर पाठांतर, गुण आणि स्पर्धात्मक परीक्षांभोवती फिरते. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा, सर्जनशीलतेचा, समस्या सोडविण्याच्या क्षमतेचा किंवा नवकल्पनांचा विकास करण्याऐवजी त्यांना परीक्षांसाठी तयार करण्यावर भर दिला जातो. परिणामी, एका परीक्षेवर विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून राहते आणि त्यातूनच पेपरफुटीसारख्या गुन्ह्यांना खतपाणी मिळते. लाखो विद्यार्थी एका प्रश्र्नपत्रिकेच्या पारदर्शकपणावर अवलंबून असतील, तर त्या प्रक्रियेतील छोटीशी त्रुटी समाजात प्रचंड असंतोष निर्माण करणारच. यासाठी परीक्षा घेण्याच्या संपूर्ण प्रक्रियेत तांत्रिक आणि प्रशासकीय सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, एन्क्रिप्शन, सुरक्षित डिजिटल वितरण प्रणाली आणि स्वतंत्र देखरेख यंत्रणा यांचा अधिक प्रभावी वापर केल्यास गैरप्रकारांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल. केंद्र सरकारने परीक्षांमधील पेपरफुटीचे प्रकार रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा देण्यासाठी सार्वजनिक परीक्षा कायद्यात सुधारणा करणाऱ्या नवीन विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली आहे. या प्रस्तावित विधेयकात दोषींना १० वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. सोमवारी हे विधेयक सादर करण्यात येणार आहे; पण हाच निर्णय काही दिवस आधी झाला असता, तर प्रधानांच्या राजीनाम्याची नौबत आली नसती. आंदोलनांची हाताळणी करण्याचे एक अलिखित शास्त्र आहे. त्यानुसार आंदोलकांच्या मागण्यांबाबत वेळीच संवेदनशीलता आणि सकारात्मकता दाखवल्यास ते चिघळण्याची शक्यता उरत नाही; पण बहुतेकदा सरकारे आंदोलकांना कमी लेखण्याची चूक करतात. शासनकर्त्यांना ही गोष्ट का समजत नाही, हे एक मोठे कोडे आहे. परिणामी, ठिणगीचा वणवा होतो. खरे पाहता सध्या सरकारमध्ये असणारे बहुतांश नेते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मुशीतून आलेले आहेत. धर्मेंद्र प्रधानही १९९० पासून 'अभाविप'चे कार्यकर्ते राहिले आहेत. ते भाजप युवामोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्षही होते. ते कुशल संघटक आहेत. ओडिशामध्ये भाजपचा पाया विस्तारण्यामध्ये त्यांची मोठी भूमिका आहे. तथापि, गेल्या पाच वर्षांपासून ते शिक्षणमंत्री असून याच काळात शिक्षण क्षेत्रात अनेक गैरप्रकार घडले. प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाची अतिरिक्त जबाबदारी सोपवली आहे. कर्नाटकातील धारवाड मतदारसंघाचे पाच वेळा लोकसभेत प्रतिनिधित्व केलेले जोशी हे संघटनात्मक कौशल्य, प्रशासकीय अनुभव आणि समन्वय साधण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जातात. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या कार्यपद्धतीत सुधारणा, प्रश्र्नपत्रिकांच्या सुरक्षिततेसाठी अधिक सक्षम यंत्रणा आणि दोषींवर तातडीने कठोर कारवाई या गोष्टींकडे नव्या शिक्षणमंत्र्यांनी प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. तत्कालिक संकट हाताळण्याबरोबरच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारीही त्यांच्यावर असेल. शालेय शिक्षणातील गुणवत्तावाढ, उच्च शिक्षणातील सुधारणा, संशोधनाला चालना, डिजिटल शिक्षणाचा विस्तार आणि केंद्र-राज्य समन्वय अधिक मजबूत करणे या क्षेत्रांत ठोस पावले उचलावी लागतील. किंडरगार्डनपासून विद्यापीठापर्यंत शिक्षणाचा संपूर्ण प्रवास नव्या युगाच्या गरजांनुसार बदलणे ही काळाची अपरिहार्यता आहे. शिक्षणव्यवस्थेच्या पुनर्बांधणीची ऐतिहासिक संधी नव्या शिक्षणमंत्र्यांना आणि सरकारला मिळाली आहे. या संधीचे रूपांतर व्यापक सुधारणांमध्ये झाले, तरच विद्यार्थ्यांचा विश्र्वास पुन्हा दृढ होईल. त्या अर्थाने सरकारसाठी ही 'अग्निपरीक्षा'च ठरणार आहे.

# कारगिल विजय दिवस आपल्यासाठी राष्ट्रनिष्ठा, शौर्य आणि बलिदानाचा प्रेरणादायी संदेश - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई । प्रतिनिधी:** कारगिल विजय दिवस हा केवळ लष्करी विजयाचा स्मृतिदिन नसून भारतीय सैनिकांच्या अदम्य शौर्य, त्याग, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहे. या दिवसातून प्रत्येक नागरिकाने 'राष्ट्र प्रथम' हा आदर्श आपल्या जीवनात अंगीकारून एकसंघ, सक्षम आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. लोकभवन येथे सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित कारगिल विजय दिवसानिमित्त वीरसैनिक, माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कृतज्ञता सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री शंभूराज देसाई, व्हॉईस ॲडमिरल संजय वात्सायन, लेफ्टनंट जनरल डी एस कुशवाह, पोलीस महासंचालक सदानंद दाते, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, तिन्ही दलांचे वरिष्ठ अधिकारी तसेच वीर सैनिक, वीरमाता, वीरपत्नी, कुटुंबीय उपस्थित होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, कारगिल युद्धात दुर्गम पर्वतरांगांमध्ये, प्रतिकूल हवामानात आणि शत्रूच्या सततच्या माऱ्यात भारतीय सैनिकांनी दाखविलेल्या पराक्रमामुळे राष्ट्राची अखंडता अबाधित राहिली. भारताच्या सीमा केवळ शस्त्रांच्या बळावर नव्हे, तर सैनिकांच्या अदम्य साहस, शिस्त आणि राष्ट्रप्रेमाच्या बळावर सुरक्षित आहेत, असे त्यांनी नमूद केले. कारगिलमधील प्रत्येक शहीदामागे एक वीरमाता, वीरनारी आणि राष्ट्रासाठी सर्वोच्च त्याग करणारे कुटुंब उभे आहे. अशा कुटुंबांप्रती संपूर्ण राष्ट्र कृतज्ञ असून त्यांच्या सन्मानासाठी आणि कल्याणासाठी समाजाने सातत्याने सहभागी व्हावे आणि नव्या पिढीने कारगिल युद्धाचा इतिहास जाणून घेत भारतीय सशस्त्र दलांच्या समर्पणाची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. वीरमाता आणि वीरपत्नींना समर्पित ऐतिहासिक देशभक्तिपर रचनेचे लोकार्पण हा अभिमानाचा क्षण असल्याचे सांगत राज्यपालांनी भारतीय स्थलसेना, नौदल आणि वायुसेनेच्या नेतृत्वासह सर्व सैनिकांच्या राष्ट्ररक्षणातील अतुलनीय योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कारगिल युद्धातील भारतीय जवानांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दाखविलेले शौर्य हे जगाच्या युद्धइतिहासातील अतुलनीय उदाहरण असून, भारताचा इतिहास जिवंत असेपर्यंत कारगिलचे वीर अजरामर राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कारगिल युद्धात शत्रू उंच पर्वतरांगांवर तळ ठोकून बसला असतानाही भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदलाने अद्वितीय समन्वय आणि पराक्रमाचे दर्शन घडवून एक-एक चौकी पुन्हा ताब्यात घेत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. गोळीबार, बॉम्बहल्ले आणि अत्यंत कठीण भौगोलिक परिस्थितीची पर्वा न करता भारतीय जवानांनी दाखविलेल्या शौर्याला तोड नाही. कॅप्टन सौरभ कालिया, कॅप्टन विक्रम बत्रा, कॅप्टन मनोज कुमार पांडे यांसारख्या अधिकाऱ्यांनी मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिल्याचे स्मरण करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या या वीरांचे योगदान भारत कधीही विसरणार नाही. आपल्या वीरांचा सन्मान करणारा समाजच उज्ज्वल भविष्य घडवू शकतो. ते म्हणाले की, सैन्यातील जवान तर मातृभूमीच्या स्वाभिमानासाठी लढत असतात. त्यामुळे शहीद झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी असल्याची जाणीव करून देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर शहीद जवानांच्या कुटुंबीयांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत मोठी वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. सुरुवातीला तीन लाख रुपयांवर असलेली मदत टप्प्याटप्प्याने वाढवून २०१७ पासून महाराष्ट्रातील प्रत्येक शहीद जवानाच्या कुटुंबाला एक कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय अमलात आणण्यात आला. शहीदांच्या बलिदानाचे मोल पैशात होऊ शकत नसले तरी राज्य शासन त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी कायम उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. भारताने संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे मोठी झेप घेतल्याचे

सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आज केवळ शस्त्रास्त्र आयात करणारा देश राहिलेला नसून अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची निर्मिती आणि निर्यात करणारे सक्षम राष्ट्र बनला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख करत त्यांनी भारतीय सशस्त्र दलांनी दहशतवाद्यांचे तळ आणि शत्रूची लष्करी ठिकाणे उद्ध्वस्त करून देशाच्या सामरिक सामर्थ्याची जगाला प्रचीती दिली, असे नमूद केले. राज्याच्या नागरिकांना सुरक्षित वातावरण लाभण्यामागे सीमेवर अहोरात्र देशरक्षण करणाऱ्या सैनिकांचे योगदान असल्याचे अधोरेखित करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व शहिदांना विनम्र अभिवादन केले. तसेच वीरसैनिक, वीरपत्नी आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करून महाराष्ट्र शासन भारतीय सशस्त्र दलांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

कारगिल विजय दिवस हा केवळ युद्धातील विजयाचा उत्सव नसून भारतीय जवानांच्या अदम्य शौर्य, त्याग, समर्पण आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांचे ऋण १४० कोटी भारतीय कधीही फेडू शकणार नाहीत. शहीद जवानांच्या वीर माता आणि वीर पत्नींचा त्याग हा देशाचा खरा स्वाभिमान असून त्यांचा सन्मान करणे हे संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, कारगिल युद्धातील विजयाला २५ वर्षे पूर्ण झाली असली तरी या विजयामागे शूर जवानांचे सर्वोच्च बलिदान आहे. त्यामुळे हा दिवस विजयाचा आनंद देतानाच हुतात्मा जवानांच्या स्मृती जागवणारा आणि भावूक करणारा आहे. देशासाठी शहीद झालेला प्रत्येक सैनिक राष्ट्रप्रेमाची अखंड ज्योत पेटवून गेला आहे. त्यांच्या पश्चात उभ्या राहिलेल्या वीर माता आणि वीर पत्नींचे धैर्य व त्याग हा देशासाठी प्रेरणादायी आहे. कारगिल युद्धभूमीला भेटीदरम्यान शहीद जवानांनी आपल्या कुटुंबीयांना लिहिलेली पत्रे वाचण्याची संधी मिळाल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री शिंदे भावूक झाले. त्या पत्रांमध्ये कुटुंबापेक्षा देशाच्या सुरक्षेची चिंता अधिक असल्याचे दिसून आले. अशा वीर सुपुत्रांमुळेच भारताचे सामर्थ्य आणि वैभव अधिक दृढ झाल्याचे त्यांनी सांगितले. कारगिल युद्धातील शौर्यगाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी महाराष्ट्र शासनाने कारगिल वॉर मेमोरियल येथे लाईट अँड साऊंड शो उभारण्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून त्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. काश्मीरशी महाराष्ट्राचे भावनिक नाते असल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, गेल्या वर्षी महाराष्ट्रातील हजारो युवकांनी काश्मीरमधील लष्करी तळावर जाऊन रक्तदान करून जवानांशी रक्ताचे नाते जोडले. तसेच कुपवाडा येथील ४१ राष्ट्रीय रायफल्सच्या कॅम्पमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले असून तो देशरक्षणाचा प्रेरणादायी संदेश देत असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख करत भारतीय सैन्याच्या पराक्रमाचे आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. भारताला शांतता हवी असली तरी देशाच्या सार्वभौमत्वावर आघात करणाऱ्यांना भारतीय सेना चोख प्रत्युत्तर देण्यास सक्षम असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कारगिल युद्धात देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांचे शौर्य आणि त्याग हा प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असून, वीर सैनिक, वीरपत्नी, वीरमाता आणि दिव्यांग सैनिकांचा सन्मान करणे ही संपूर्ण समाजाची कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, १९९९ मध्ये कारगिलच्या दुर्गम आणि प्रतिकूल परिस्थितीत भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवत विजय मिळवला आणि हिमालयाच्या उंच शिखरावर तिरंगा फडकावला. हा विजय भारतीय सैन्याच्या अदम्य पराक्रमाचे प्रतीक असून, त्याच्या स्मरणार्थ कारगिल विजय दिन साजरा केला जातो. त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा आणि राष्ट्रसेवेचा वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. देशरक्षणाच्या प्रत्येक प्रसंगी महाराष्ट्राने नेहमीच अग्रस्थानी राहून योगदान दिले असून, कारगिल युद्धात राज्यातील अनेक जवानांनी शौर्य, त्याग आणि देशभक्तीचे सर्वोच्च उदाहरण घालून दिले. मातृभूमीच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले बलिदान कधीही विसरता येणार नाही. वीर सैनिकांच्या कुटुंबीयांचा उल्लेख करताना उपमुख्यमंत्री पवार यांनी वीरपत्नी आणि वीरमातांच्या धैर्याला विशेष सलाम केला. आपल्या कुटुंबातील सदस्याला देशसेवेसाठी सीमेवर पाठवताना त्यांनी दाखविलेला त्याग आणि धैर्य संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या योगदानामुळेच देशातील १४० कोटी नागरिक सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासन हे माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता आणि दिव्यांग सैनिकांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य पुढेही सुरू राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली. या कारगिल विजय दिनानिमित्त भारतीय नौदलाच्या बँडचे सादरीकरण, देशभक्तीपर गीत तसेच तिन्ही लष्कर, नौदल व हवाई दलाचे दृकश्राव्य सादरीकरण झाले. तसेच महाराष्ट्रातील कारगिल युद्धातील शौर्य पुरस्कार विजेते, वीरमाता, वीरपत्नी आणि दिव्यांग सैनिक अशा एकूण ३९ जणांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

त्यानंतर भारतीय नौदल बँडला रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. तसेच कवी प्रदीप यांच्या देशभक्तीपर रचनेच्या निर्मिती आणि प्रकाशनाशी संबंधित स्वराधीश डॉ. भरत बलवल्ली यांचा गौरव करण्यात आला. त्यानंतर या देशभक्तीपर गीताचे औपचारिक लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले.

# पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तीन प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार - मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ



## उन्नत सामुहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर), पुणे अंतर्गत रिंगरोड आणि बोगद्यांचे जाळे प्रकल्पांचे सादरीकरण

**मुंबई । प्रतिनिधी :** पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उच्चक्षमता उन्नत सामुहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर), पुणे अंतर्गत रिंगरोड आणि बोगद्यांचे जाळे हे तीन प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पांसाठी शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा, भूसंपादन आणि प्रकल्पनिहाय प्रशासकीय प्रक्रिया समन्वयाने पूर्ण करून संबंधित पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील प्रमुख शहरी वाहतूक प्रकल्पांच्या नियोजन, वित्तीय व्यवस्थापन, अंमलबजावणी, देखरेखीसाठी गठित उच्चस्तरीय समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त अभिजित चौधरी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अति पोलीस आयुक्त मनोज पाटील आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी व अति पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पांची माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उच्चक्षमता उन्नत सामूहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर) हा पुण्याच्या भविष्यातील दीर्घकालीन गुंतवणुकीसाठीचा एक परिवर्तनकारी पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. एचसीएमटीआर व बोगदा प्रकल्प हे पुणे शहराला अधिक कार्यक्षम, वाहतूक सुलभ व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यात महत्वाची भूमिका बजावणार आहेत. या तीनही प्रकल्पांसाठी लागणारी शासकीय जमीन पुणे महापालिका व पुणे महानगर विकास प्राधिकरण यांना देण्यासाठी एकत्रित शासन निर्णय काढण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावे. तसेच रिंगरोड प्रकल्पासाठी लागणारी खासगी जमीन संपादनासाठी रोख मोबदला देण्यात यावी.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उच्चक्षमता सामूहिक वाहतूक मार्ग प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. ४३.६० किमी अंतराच्या या प्रकल्पामुळे २५ ते ३० टक्के वाहतूक कमी होणार आहे. यामुळे सर्व मेट्रोमार्गिका जोडल्या जाणार असून रस्त्याची वाहतूक क्षमता वाढणार आहे. त्यामुळे एचसीएमटीआर या प्रकल्पाचे काम लवकर सुरू करुन २०२८ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. यासाठीचे आर्थिक मॉडेल तयार करून प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. पीएमआरडीएद्वारे राबविण्यात येणारा अंतर्गत रिंग रोड हा प्रकल्प ८३.१२ किमीचा असून यामध्ये ४४ गावांचा समावेश आहे. या अंतर्गत रिंग रोडचे काम पाच टप्प्यात राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रकल्पाची प्रक्रिया येत्या सहा ते सात महिन्यांत पूर्ण करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. रोख मोबदला देऊन रिंगरोडच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पाताळलोक प्रकल्पाअंतर्गत पुणे शहरात तीन ठिकाणी बोगदे तयार करण्यात येणार आहेत. यामध्ये भोसरी ते उंड्री नवीन विमानतळ (३६ किमी यामध्ये १० किमी एलिव्हेटेड), रामनदी- भूगाव ते राजाराम पूल (८ किमी) आणि तळजाई टेकडी ते पद्मावती-हिंगणे (१.६५ किमी) या बोगद्यांचे प्रस्तावित आहे. या बोगद्यांच्या जाळ्यांचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ संस्थेची अथवा तज्ज्ञांची मदत घेऊन सर्वंकष सर्वेक्षण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. पीएमआरडीएच्या प्रस्तावित नगररचना (टीपीएस) योजनासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली. पीएमआरडीए व पुणे महापालिकेच्या १५ नगर रचना योजना प्रस्तावित असून या योजना रद्द करण्यासंदर्भात पीएमआरडीएने आपल्या स्तरावर प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### माळशेज घाटात रस्ता खचला; मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प

प्रशासनाचा तातडीचा निर्णय; पर्यायी मार्गाने प्रवास करण्याचे आवाहन





**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे । प्रतिनिधी :** पुणे-अहिल्यानगरकडून मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. कल्याणअहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील माळशेज घाटात जुन्नर तालुक्यातील करंजाळे गावाजवळ रस्त्याचा काही भाग खचल्याने प्रशासनाने घाटातील सर्व प्रकारची वाहतूक तात्पुरती बंद केली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तसेच संभाव्य अपघात आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी माळशेज घाटातील वाहतूक बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या सर्व वाहनांना पर्यायी मार्गाचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने वाहतूक आळेफाटा नारायणगाव खेड चाकण तळेगाव एमआयडीसी लोणावळा खोपोली मुंबई या पर्यायी मार्गाने वळविली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून पर्यायी मार्गानेच प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासंदर्भात ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनीही नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

### उल्हासनगर हादरलं! प्रेमसंबंधाच्या वादातून आईनेच केली २० वर्षीय मुलीची हत्या; आरोपी आई अटकेत



**दैनिक आपला विदर्भ**

**उल्हासनगर। प्रतिनिधी :** उल्हासनगर शहरात नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रेमसंबंधावरून झालेल्या वादातून आईनेच आपल्या २० वर्षीय मुलीचा गळा आवळून खून केल्याची घटना समोर आली असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



या प्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाणे क्रमांक १ च्या पोलिसांनी आरोपी आई आशा गरड हिला अटक केली आहे. प्राथमिक तपासात मुलीच्या प्रेमसंबंधावरून आई-मुलीत वारंवार वाद होत असल्याचे समोर आले असून, त्याच वादाचे पर्यवसान या हत्येत झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. आरोपी आईविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगर पोलीस ठाणे क्रमांक १ चे पथक करत आहे. या घटनेमुळे उल्हासनगरमध्ये हळहळ व्यक्त होत असून नातेसंबंधांतील वाढत्या तणावाबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.

### रॉ अधिकारी असल्याचे भासवून लाखोंची खंडणी मागणारा जेरबंद

**राजकोट :** गुजरातमधील राजकोट येथील एका धान्य व्यापाऱ्याचे बँक खाते ऑनलाईन व्यवहारानंतर गोठवून,स्वत:ला 'रॉ'अधिकारी असल्याचे भासवत खाते सुरू करून देण्यासाठी सव्वा चार लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या परेश प्रवीण कोठारी(वय ४२,रा.सातारा रस्ता,पुणे)याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने अटक केली.या प्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या खात्यात वेगवेगळ्या खात्यांतून चार हजार रुपये जमा झाल्यानंतर बँक खाते गोठविण्यात आले.चौकशीत हे व्यवहार पुण्यातील खात्यांतून झाल्याचे समोर आले.

# उमेदच्या माध्यमातून राज्यात महिला बचत गट नोंदणी व १ कोटी लखपती दीदी संकल्प अभियान

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सबलीकरण आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्राम विकास विभागाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत 'महिला बचत गट नोंदणी मोहीम व १ कोटी लखपती दीदी संकल्प अभियान' राबविण्याचा शासन निर्णय १७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केला आहे. सन २०२६ ते २०२९ या कालावधीत हे अभियान राज्यभर प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर डुबे पाटील यांनी दिली आहे.

**बचत गटांसोबत वंचित महिलांना जोडण्यावर भर**

या अभियानांतर्गत अद्याप कोणत्याही स्वयं सहाय्यता (बचत) गटाशी जोडल्या न गेलेल्या ग्रामीण महिलांची नोंदणी करण्यात येणार आहे. विशेषतः हंगामी स्थलांतरित महिला, ऊसतोड कामगार, वीटभट्टी कामगार; तसेच सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील महिलांना ग्रामसखी आणि समुदायस्तरीय संस्थांच्या माध्यमातून प्राधान्याने बचत गटांशी जोडले जाणार आहे.

**१ कोटी लखपती दीदी घडविण्याचे लक्ष्य**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात ६ कोटी लखपती दीदी घडविण्याचा संकल्प केला आहे. त्याला गती देत महाराष्ट्रातील १ कोटी ग्रामीण महिलांना लखपती दीदी बनविण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. ग्राम विकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात आणि राज्यमंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उमेद हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे श्रीधर डुबे पाटील यांनी सांगितले.

**जागृती मोहीम आणि क्षमता बांधणी कार्यशाळा**

ग्राम विकास व पंचायतराज विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार यांनी सांगितले की, जुलै ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्यभर व्यापक जनजागृती मोहीम आणि क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्यात येतील. या माध्यमातून स्थानिक समुदाय संस्था आणि महिलांना अभियानाच्या विविध टप्प्यांचे प्रशिक्षण दिले जाईल.

**शासकीय योजनांचा कृतिसंगम**

या अभियानाद्वारे महिलांना केवळ बचत गटात सहभागी करून घेणे एवढ्यावर मर्यादित न राहता, विविध शासकीय योजनांचा कृतिसंगम साधून त्यांना कौशल्य विकास, वित्तीय सेवा तसेच त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे महिलांच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक समृद्धीचा मार्ग मोकळा होणार आहे.

**सविस्तर मार्गदर्शक सूचना**

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, नवी मुंबई यांच्या स्तरावरून सविस्तर मार्गदर्शक सूचना सुद्धा निर्गमित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांच्या जीवनात आत्मसन्मान, स्वावलंबन आणि आर्थिक स्थैर्याचे नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास सचिव चंद्रकांत पुलकुंडवार यांनी व्यक्त केला.

**महिलांना सहभागाचे आवाहन**

ग्रामीण भागातील बचत गटात अद्याप सहभागी न झालेल्या सर्व पात्र महिलांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा आणि मोठ्या संख्येने बचत गटांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर डुबे पाटील यांनी केले आहे.

## २९ जुलैला होणार पार्थ पवार आणि कायनात दारा यांचा साखरपुडा, निमंत्रण पत्रिका समोर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा खासदार पार्थ पवार यांचा साखरपुडा कायनात दारा यांच्याशी होणार आहे. मागील काही दिवसांपूर्वीच त्यांच्या नात्यासंदर्भात अधिकृत माहिती देण्यात आली होती. त्यानुसार पार्थ आणि कायनात यांचा साखरपुडा बुधवार २९ जुलै रोजी पुण्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये होणार आहे. तर दोघांचं लग्न २७ फेब्रुवारी २०२७ रोजी होणार आहे.



पार्थ आणि कायनात यांच्या साखरपुड्याची निमंत्रण पत्रिका समोर आली असून बुधवारी होणाऱ्या या साखरपुड्याची जय्यत तयारी सुरु झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खासदार पार्थ पवार आणि कायनात दारा यांचा साखरपुडा हा येत्या २९ जुलैला पुण्यातील द रिट्झ-कार्लटन या पंचतारांकित हॉटेलमध्ये होणार आहे. या साखरपुड्याला पक्षातील सगळे आमदार खासदार आणि मोजक्या माजी आमदारांना निमंत्रण देण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसह इतर पक्ष्यातील प्रमुख नेत्यांना सुद्धा हे निमंत्रण पोहोचले आहे. संबंधित कुटुंबातील सदस्य आणि नेतेमंडळी असे २०० ते २५० लोकांमध्ये पार्थ पवार यांचा साखरपुडा पार पडणार असल्याची माहिती देण्यात आलेली आहे.

काही दिवसांपूर्वी पवार कुटुंबाकडून एक अधिकृत पत्रक जारी करण्यात आलं होतं, ज्यात खासदार पार्थ पवार आणि कायनात दार यांच्या लग्नाविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली. यात सांगण्यात आलेले की, 'खासदार पार्थ पवार यांच्या विवाहासंदर्भात समाजात व्यक्त होत असलेल्या धार्मिक शंकांचे निरसन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उमेश पाटील यांनी पूज्य शंकराचार्यांची भेट घेऊन मार्गदर्शन घेतले व त्याच ठिकाणी विवाहाच्या तारखेची व ठिकाणाची माहिती दिली.

## शर्वरी डोंगरे संगीत विशारद परिक्षेत भारतात प्रथम

**दैनिक आपला विदर्भ**



**धाराशिव। प्रतिनिधी :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ तर्फे घेण्यात आलेल्या संगीत विशारद परिक्षेत सुप्रसिद्ध युवा गायिका शर्वरी डोंगरे हिने भारतात प्रथम क्रमांक संपादन केला आहे. यासोबत तिला संगीत क्षेत्रातील मानाचे आठ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार व दोन राज्य पातळीवरील अशा एकूण दहा प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी तिची निवड झाली असून त्याचे वितरण २२ ऑगस्ट रोजी नवी मुंबई येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात होणा-या अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या दिक्षांत समारंभात करण्यात येणार आहे. गेल्या दहा वर्षांपासून तिची संगीत साधना सुरु असून या पूर्वीही तिला पं शंकरराव व्यास या मानाच्या पुरस्कारासह अनेक सन्मान प्राप्त झाले असून भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या कार्यक्रमातही तिने आपली कला सादर केली आहे. चला हवा येऊ द्या, स्टार प्रवाह सह अनेकदा राष्ट्रीय स्तरावरील संगीत महोत्सव व स्पर्धेत तिने यशस्वी घेतला आहे.

## घोटी-सिन्नर फाटा उड्डाणपुलावर ट्रक दुभाजकाला धडकून उलटला अनब... महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी

**दैनिक आपला विदर्भ**

**घोटी। प्रतिनिधी :** नाशिक-मुंबई महामार्गावर घोटी-सिन्नर फाटा उड्डाणपुलावर आज एक भीषण अपघात घडला. विटांनी भरलेला एक भरधाव ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने थेट दुभाजकाला धडकून महामार्गावरच पलटी झाला. या अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असून ट्रकमधील शेकडो विटा महामार्गावर विखुरल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ज्यामुळे एक मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विटांची वाहतूक करणारा हा ट्रक नाशिकच्या दिशेने जात असताना घोटी-सिन्नर फाटा येथील उड्डाणपुलावर आला असता, अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्याने भरधाव ट्रक थेट रस्त्यावरील दुभाजकावर जाऊन आदळला आणि मोठ्या आवाजासह रस्त्याच्या मधोमध पलटी झाला. अपघाताचा आवाज इतका मोठा होता की, आसपासचे नागरिक



आणि इतर वाहनचालक तातडीने मदतीसाठी धावले. ट्रक पलटी झाल्यामुळे त्यामध्ये असलेल्या हजारो विटा नाशिक-मुंबई महामार्गावर पसरल्या. यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्र (घोटी) आणि घोटी पोलीस ठाण्याचे कर्मचारी व बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलीसांनी घटनास्थळी पोहोचून सुरक्षेच्या कारणास्तव तत्काळ परिसराची नाकाबंदी केली आणि महामार्गावर विखुरलेल्या विटा हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. वाहनांची लांबच लांब रांग लागू नये म्हणून पोलीसांनी वाहतूक दुसऱ्या बाजूने वळवून सध्या एकेरी मार्गाने वाहतूक पूर्ववत सुरू केली आहे. महामार्गावरून अपघातग्रस्त ट्रक आणि विटा बाजूला करण्याचे काम वेगाने सुरू असून लवकरच दोन्ही मार्गिका पूर्णपणे मोकळ्या केल्या जातील, अशी माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## पोषण पुनर्वसन केंद्रांना मंत्री आदिती तटकरे यांच्या भेटी

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती । प्रतिनिधी :** महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त डॉ. माधवी सरदेशमुख, उपआयुक्त संगीता लोंढे; तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सुरेखा ठाकरे यांच्या उपस्थितीत मेळघाटचा दौरा केला.



दौऱ्यादरम्यान त्यांनी भोकरबर्डी, धुळघाट रोड आणि कळमखार येथील अंगणवाडी केंद्रांना भेट देऊन तेथील सुविधा, बालकांचे पोषण व आरोग्य सेवांची पाहणी केली. यावेळी त्यांनी बालक, पालक आणि अंगणवाडी सेविकांशी संवाद साधला. त्याचबरोबर स्थानिक आदिवासी महिला बचतगटाच्या सदस्यांशीही संवाद साधून त्यांच्या उपक्रमांची माहिती घेत महिला सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले.

धारणी येथील पोषण पुनर्वसन केंद्रालाही श्रीमती तटकरे यांनी भेट देऊन तेथील उपचार व्यवस्था, आरोग्य सुविधा आणि कुपोषित बालकांच्या उपचारांचा आढावा घेतला. उपचार घेत असलेल्या बालकांच्या मातांशी संवाद साधून त्यांना मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधा व पोषण व्यवस्थेची माहिती घेतली.

धारणी तहसील कार्यालयात मेळघाटातील महिला व बालविकास विभागाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत बालविवाह प्रतिबंधासाठी विशेष उपाययोजना, बालकाच्या जन्मानंतरच्या पहिल्या १,००० दिवसांतील पोषणावर भर, अंगणवाड्यांमध्ये सौरऊर्जा, स्वच्छतागृहे व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, गरोदर मातांसाठी दर्जेदार आहार, अंगणवाडी बांधकामांना गती; तसेच महिला व बालकांसाठीच्या शासकीय योजनांची माहिती ग्रामसभांमार्फत तळागाळापर्यंत पोहोचविण्याबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

# मधमाशी पालनासाठी ५० टक्के अनुदान; पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यभर मधकेंद्र (मधमाशी पालन) योजना राबविण्यात येत असून, या योजनेसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, मधमाशी पालनासाठी आवश्यक साहित्यावर ५० टक्के अनुदान आणि उर्वरित ५० टक्के स्वगुंतवणूक, शासनाच्या हमीभावाने मध खरेदी तसेच विशेष तांत्रिक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय मधमाशांचे संरक्षण व संवर्धनाबाबत जनजागृतीही करण्यात येणार आहे. योजनेत वैयक्तिक मधपाळ, प्रगतीशील मधपाळ (केंद्रचालक) आणि नोंदणीकृत संस्था अशा तीन प्रवर्गांचा समावेश आहे. वैयक्तिक मधपाळांना १० मधपेट्यांचा लाभ दिला जाणार असून अर्जदार साक्षर, १८ वर्षांपेक्षा जास्त वयाचा असावा. स्वतःची शेती असल्यास प्राधान्य दिले जाईल.

प्रगतीशील मधपाळ (केंद्रचालक) यांच्यासाठी किमान दहावी उत्तीर्ण, वय २१ वर्षांपेक्षा अधिक, स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या नावावर अथवा भाडेतत्त्वावरील किमान एक एकर शेती असणे आवश्यक आहे. तसेच मधमाशी पालन, प्रजनन आणि मध उत्पादनाबाबत प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असणे गरजेचे आहे. संस्थांसाठी संस्था नोंदणीकृत असणे, स्वतःच्या किंवा भाडेतत्त्वावरील किमान एक हजार चौरस फूट इमारत उपलब्ध असणे तसेच प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक सुविधा असणे बंधनकारक आहे. केंद्रचालकांनी मधपेट्या ५० टक्के अनुदानावर घेण्यासाठी उर्वरित ५० टक्के रक्कम प्रथम जिल्हा कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील.



लाभार्थी निवडीनंतर प्रशिक्षणापूर्वी मध व्यवसाय सुरू करण्याबाबत मंडळास बंधपत्र देणे आवश्यक असून प्रशिक्षण मंडळामार्फत पूर्णपणे मोफत दिले जाईल. मंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी प्रशिक्षण घेणे अनिवार्य राहणार आहे.

योजनेचे अर्ज महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, बुलढाणा येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, आशिर्वाद बिल्डिंग, मुजे ले-आऊट, मलेरिया कार्यालयाजवळ, बुलढाणा येथे संपर्क साधावा, तसेच दूरध्वनी (०७२६२) २९९०७६, मोबाईल ९८२२५२८५३४, ७०५७८८७८८७, ९८८१९११०८४, ई-मेल : dviobuldhana@mskvib.org किंवा मध संचालनालय, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, महाबळेश्वर, जि. सातारा येथेही संपर्क साधता येईल.

## वृत्तविशेष...

### ऑनलाइन क्रीडा स्पर्धा सॉफ्टवेअरचे ३ ऑगस्टला प्रशिक्षण; जिल्ह्यातील क्रीडा शिक्षक, संगणक चालक व क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना उपस्थितीचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्ह्यातील विविध एकविध खेळ संघटनांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन सॉफ्टवेअर हाताळणीचे प्रशिक्षण सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरून रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रात तालुकास्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांसाठी प्रवेश अर्ज ऑनलाइन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून स्वीकारले जाणार आहेत. या सॉफ्टवेअरची प्रभावी हाताळणी, स्पर्धांचे नियोजन आणि आयोजन सुलभ व्हावे, यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

प्रशिक्षणाचे दोन सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मोताळा, मलकापूर, खामगाव, शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद आणि नांदुरा तालुक्यातील शिक्षक व प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण होणार आहे. तर दुपारी २ ते सायंकाळी ४ या वेळेत सिंदखेड राजा, मेहकर, लोणार, चिखली, देऊळगाव राजा आणि बुलढाणा तालुक्यातील सहभागींसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनांच्या शाळा, विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांतील क्रीडा शिक्षक, ऑनलाइन कामकाज पाहणारे संगणक चालक तसेच विविध खेळ संघटनांचे पदाधिकारी यांनी नियोजित वेळेनुसार मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी केले आहे.

### प्रवाश्यांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन; राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम

**बुलढाणा । प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत ''प्रवासी राजा दिन'' व दुपारी ३ ते ५ या वेळेत ''कामगार पालक दिन'' आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील. बुलढाणा विभागातील बुलढाणा आगार येथे दि.२९.जुलै ,चिखली आगार येथे दि. ५ ऑगस्ट, खामगाव आगार येथे दि. १२ ऑगस्ट, मेहकर आगार येथे दि. १९ ऑगस्ट , मलकापुर येथे दि. २ सप्टेंबर, जळगाव जामोद येथे दि. ९ सप्टेंबर व शेगांव आगार येथे दि. १६ सप्टेंबर रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

### मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भीषण वाहतूक कोंडी; चाकरमान्यांचे मोठे हाल

**वसई । प्रतिनिधी:** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी सकाळी भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली असून यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. वसई पूर्वेच्या भागातून जाणाऱ्या या महामार्गावर मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर (मुंबई वाहिनी) सकाळपासूनच घोडबंदर रोड ते ससूनवघर आणि मालजीपाडा दरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. घोडबंदर रोड आणि वर्सोवा पुलापासून सुरू झालेली ही कोंडी मालजीपाडापर्यंत पोहचली असून महामार्गावर वाहने अतिशय धिम्या गतीने सरकत आहेत. हा महामार्ग मुंबई, ठाणे, वसई-विरार, मिरा-भाईदर, पालघर आणि गुजरात यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या भागांना जोडणारा मुख्य मार्ग मानला जातो. मात्र, मागील काही वर्षांपासून या महामार्गावर सतत पाणी साचणे, रस्त्यांवर पडलेले मोठे खड्डे, अपघातांचे वाढते प्रमाण आणि नियमित होणारी वाहतूक कोंडी यांमुळे हा मार्ग प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे. आठवड्याचा पहिलाच दिवस असल्याने कामावर जाणारे चाकरमानी, शाळकरी विद्यार्थी आणि इतर महत्त्वाच्या कामांसाठी बाहेर पडलेले नागरिक या कोंडीत तासन्तास अडकून पडले आहेत.

# उद्धव ठाकरे मुख्यमंत्रीच नव्हे, तर देशाचे पंतप्रधान व्हावेत : आ. सिद्धार्थ खरात

## ➤ वाढदिवसानिमित्त मेहकर-लोणार मतदारसंघात समाजोपयोगी उपक्रम

## ➤ कमळजा माता मंदिरात छाती इतक्या पाण्यातून जाऊन केली विशेष प्रार्थना









दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मेहकर-लोणार मतदारसंघात विविध सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणपूरक व आरोग्यविषयक उपक्रम उत्साहात पार पडले. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमांना शिवसैनिक, पदाधिकारी, नागरिक तसेच विविध शासकीय विभागांतील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मेहकर येथील श्री शारंगधर बालाजी मंदिरात उद्धव ठाकरे यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व निरामय आयुष्यासाठी विशेष प्रार्थनेने झाली. त्यानंतर पंचायत समिती कार्यालय, मेहकर तसेच खंडाळा तहसील कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळवाटप करण्यात आले, तर हिवराश्रम येथील



जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमांतील सर्वाधिक लक्षवेधी क्षण लोणार येथील सरोवरातील कमळजा माता मंदिरात अनुभवायला मिळाला. सरोवरात कमरेच्या वरपर्यंत पाणी साचलेले असतानाही आमदार सिद्धार्थ खरात यांनी धाडसाने पाण्यातून वाट काढत मंदिर गाठले. मंदिरात पोहोचल्यानंतर त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व यशस्वी राजकीय वाटचालीसाठी कमळजा मातेच्या चरणी विशेष प्रार्थना केली. तसेच देवीची विधिवत आरती करून आशीर्वाद घेतले.

प्रतिकूल परिस्थितीतही श्रद्धा आणि निष्ठेचे दर्शन घडविणाऱ्या या कृतीची उपस्थित नागरिक व शिवसैनिकांमध्ये विशेष चर्चा रंगली. यावेळी बोलताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत,उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेच, शिवाय भविष्यात देशाचे नेतृत्व करत पंतप्रधानपदही भूषवावे, हीच माझी मनापासूनची इच्छा आहे, अशी भावना व्यक्त केली. त्यांच्या या विधानाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


कार्यक्रमात नगराध्यक्ष किशोर गारोळे, मेहकर तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवा सेना तालुकाप्रमुख ॲड. आकाश घोडे, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय वडतकर, तेजराव घायाळ, गजानन खरात, तानाजी मापारी, पाशा खान, शालिनीताई मोरे, विलास शिंदे. नगरसेवक प्रा. सतीश ताजणे, महेश रिढे, नितीन तुपे, ॲड. संदीप गवई, गोपाल गायकवाड, संदीप गारोळे, साहेबराव हिवाळे, अमोल बोरे, गजानन मोरे, वैभव कायंदे, देवांत संचेती,असलम शहा, छोटू गवळी, हरीश पवार, राजीक अली, रफिक गवळी, सादिक बागवान, भागवत बोरकर, तानाजी अंभोरे, अंकुश घायाळ, उमेश चनखोरे, दीपक गायकवाड, पवन टाले, डॉ. शेषराव बदर, गणेश गावंडे, रवी गिरी, कडोबा शेजुळ, स्वातीताई नवले यांच्यासह मेहकर व लोणार तालुक्यातील पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.


यावेळी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके, गटविकास अधिकारी खरात. संदीप मेटांगळे तसेच पंचायत समिती व तहसील कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस केवळ औपचारिकतेपुरता न साजरा करता समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. वृक्षारोपण, फळवाटप, शालेय साहित्य वितरण, मंदिरांमध्ये विशेष प्रार्थना तसेच लोणारच्या कमळजा माता मंदिरात प्रतिकूल परिस्थितीत जाऊन केलेली आरती या उपक्रमांमुळे मेहकर-लोणार मतदारसंघात दिवसभर उत्साहाचे आणि सामाजिक बांधिलकीचे वातावरण पाहायला मिळाले.

# ताडोबातील मोनाचे ज्ञानगंगा अभयारण्यात आगमन

## धुरंधरला मिळाला जोडीदार; ज्ञानगंगेत वाघसंवर्धनाला नवी दिशा





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यात गेल्या सात महिन्यांपासून एकाकी वास्तव्य करणाऱ्या धुरंधर या नर वाघाला अखेर जोडीदार मिळाला आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातून मोना या सुमारे २४ महिन्यांच्या वाघिणीला रविवारी (२६ जुलै) मध्यरात्री विशेष बंदोबस्तात ज्ञानगंगा अभयारण्यात आणून खामगाव वनपरिक्षेत्रात सुरक्षितपणे सोडण्यात आले. या दोन्ही वाघांच्या संभाव्य मिलनामुळे ज्ञानगंगा अभयारण्यात वाघसंवर्धनाला नवी चालना मिळणार असल्याने वन्यजीवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

यावर्षी ३ जानेवारीच्या रात्री पेंच व्याघ्र प्रकल्पातून धुरंधर या तरुण नर वाघाचे ज्ञानगंगा अभयारण्यात पुनर्वसन करण्यात आले होते. प्रारंभी त्याला सुमारे १५ दिवस संरक्षित तारकुंपणात ठेवण्यात आले. त्यानंतर त्याने संपूर्ण अभयारण्याचा परिसर फिरून स्वतःचे अधिवास क्षेत्र निश्चित केले. मात्र, दीर्घकालीन वाघसंवर्धनासाठी त्याला जोडीदाराची आवश्यकता असल्याने वन विभागाने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील मोना या प्रौढ वाघिणीची निवड केली.

रविवारी उशिरा रात्री मोनाला विशेष वाहनातून ज्ञानगंगा अभयारण्यात आणण्यात आले. वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तिला खामगाव वनपरिक्षेत्रात सुरक्षितरीत्या मुक्त करण्यात आले.

या स्थलांतर मोहिमेदरम्यान अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी (डीएफओ) यशवंत नागुलवार, सहाय्यक वनसंरक्षक चेतन राठोड, खामगावचे वनपरिक्षेत्र अधिकारी दीपेश लोखंडे, बुलढाण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रकाश सावळे तसेच वन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

वन विभागाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे ज्ञानगंगा अभयारण्यात वाघांच्या नैसर्गिक प्रजननाला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा असून, भविष्यात येथे वाघांची संख्या वाढून जैवविविधतेच्या संवर्धनाला नवी गती मिळेल, असा विश्वास वन विभागाने व्यक्त केला आहे.

# ३१ जुलैपर्यंत पीक विमा भरण्याचे आवाहन; नैसर्गिक आपत्तीपासून पिकांना मिळणार आर्थिक संरक्षण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** खरीप हंगाम २०२६-२७ साठी बुलढाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून, यंदा बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची जिल्ह्यासाठी अधिकृत विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ तसेच कीड-रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी सर्व कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी पीक विमा भरावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.

शेतकरी आपल्या जवळील कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC), महा-ई-सेवा केंद्र, बँक तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अधिकृत NCIP पोर्टलद्वारे पीक विमा भरू शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत असून, त्यानंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यामुळे अंतिम दिवसाची वाट न पाहता वेळेत विमा भरून पिकांचे संरक्षण करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विमा भरताना किंवा पिकाच्या नुकसानीची माहिती नोंदविताना अडचण आल्यास संबंधित तालुक्यातील बजाज जनरल इन्शुरन्स कंपनीचे

### बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची जिल्ह्यासाठी अधिकृत विमा कंपनी



तालुका समन्वयक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.

जिल्हा व तालुका स्तरावर कंपनीचे प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले असून प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र समन्वयक उपलब्ध आहेत. पीकनिहाय शेतकरी हिस्सा (प्रति हेक्टर विमा हप्ता) सोयाबीन १,२५०, कापूस - १,३००, तूर - ९४०, मुग - ७५, उडीद - ६७.५०, मका - १०० प्रमाणे आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून संरक्षण मिळविण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी पीक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना: पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण 100% मोफत; काम गतीने पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना जलदगतीने मिळावा, यासाठी प्रशासनाने वेगाने पावले उचलली आहेत.

या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी आपला ॲग्रीस्टॅक क्रमांक सोबत घेऊन जवळच्या महा-ई-सेवा किंवा सीएससी केंद्रांवर जाऊन आपले आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) त्वरित पूर्ण करावे. ही संपूर्ण प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी १००% मोफत असून, योजनेचे काम विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांनी दिले आहेत.

ही पहिली यादी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, तलाठी कार्यालये, विकास सोसायट्या आणि बँकांच्या शाखांमध्ये सर्वांना दिसेल अशी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांची नावे या पहिल्या यादीत नाहीत, त्यांनी अजिबात काळजी करू नये, त्यांची नावे पुढील यादीत नक्की येतील, अशी ग्वाही जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण यांनी दिली आहे.

यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी आपले बँक खाते व कर्जमाफीची रक्कम तपासून मोफत आधार प्रमाणीकरण करावे. ई-सेवा केंद्र चालकांना शासनाकडून मोबदला मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी त्यांना कोणतेही शुल्क देऊ नये, असे आदेश प्रशासनाने दिले आहेत. तसेच, माहितीत काही चूक वाटल्यास शेतकऱ्यांनी थेट पोर्टलवर



तक्रार नोंदवावी, प्रशासकीय समिती ती तत्परतेने सोडवून न्याय देईल.

शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. ज्या गावांमध्ये सध्या एकही आधार प्रमाणीकरण केंद्र नाही, तेथे तातडीने नवीन केंद्रे सुरू करण्याच्या आणि ग्रामपंचायतींमधील बंद असलेली केंद्रे तत्काळ कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी या मोफत व सोप्या सुविधेचा लाभ घ्यावा, जेणेकरून कर्जमाफीचा मार्ग लवकर मोकळा होईल. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कवळे, जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, संजय खडसे (सिंदखेड राजा), रवींद्र जोगी (मेहकर), अग्रणी बँक व्यवस्थापक शैलेंद्र सिंह, महा आयटीचे प्रसन्न बोरकर आणि बीडीसीसीचे आर.टी. मस्के प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच, दृकश्राव्य प्रणालीद्वारे (व्हीसी) जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहायक निबंधक व तालुका कृषी अधिकारी जोडले गेले होते. प्रशासनाच्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून ही योजना यशस्वी करण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले.